नि.दि.दावा. क्र. ३४/१७
**नि.क्र. २४**

## वादी तुकारामचा पुरवणी सरतपास वकील श्री.

मला आता गट नं.१००, ८३ आणि १४५ चे ७/१२ उतारे दाखविले, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर ७/१२ उता-यांना अनुक्रमे **नि.२७ ते २९** देण्यात येते. मला आता मी प्रतिवादीला पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत दाखविली, त्यातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे असुन, खरा व बरोबर आहे. नोटीसीच्या स्थळप्रतीस **नि.३०** देण्यात येते. मला आता नि.२६ अनुक्रमे १ खाली दाखल केलेल्या विदर्भ को ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीने जारी केलेली नोटीस दाखविली, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसीस आर्टीकल अ देण्यात येते. मला आता नि. २६ अनुक्रमे २ ते ७ खाली दाखल केलेले दवाखान्याचे प्रिस्क्रीप्शन आणि वैद्यकीय रिपोर्ट दाखविले, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर कागदपत्रांना अनुक्रमे आर्टीकल ब ते ग देण्यात येते. मला आता नि.२६ अनुक्रमे ८ खाली दाखल केलेले बॅकेचे पासबुकची छायांकित प्रत दाखविली, सदर प्रतीस आर्टीकल ह देण्यात येते.

## वादी तुकारामचा प्रतिवादीतर्फे उलटतपास वकील श्री. जैन.

२ हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील ५० वर्षापुर्वी मरण पावलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वडील मरण पावले त्यावेळी मी एकटाच सज्ञान होतो बाकीचे सर्व भाउ बहीण अज्ञान होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घरातील सर्वात थोरला असल्याकारणाने सर्व व्यवहार मीच बघायचो. घरातील थोरला पुरुष कुटुंबाचा कर्ता राहत असल्याचे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वडील मरण पावले त्यावेळी माझे वय अठरा वर्ष होते. हे म्हणणे खरे आहे की, मी २६ वर्षाचा असतांना मला नोकरी लागलेली आहे. मी एस.टी. महामंडळामध्ये हेल्पर म्हणुन नोकरीला लागलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझा पगार दरमहा १२०/- रुपये होता. हे म्हणणे खरे नाही की, मी ब्राम्हणीवरुन नोकरीचे ठिकाणी म्हणजे नागपूरला ये-जा करायचो. हे म्हणणे खरे नाही की, सदरवेळी एस.टी. महामंडळाकडून क्वार्टर मिळत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सुरुवातीपासुन ब्राम्हणी येथेच राहण्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नागपूर, काटोल, रामटेक येथे नोकरीला असतांना राहील्याचे

दाव्यात तसेच सरतपासाचे शपथपत्रात उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नागपूर वगैरे ठिकाणी कधी राहीलो नाही म्हणूनच त्याचा उल्लेख केलेला नाही.

३ सरतपासाचे शपथपत्र तयार करण्याकरीता वकीलांना मी निश्चीत किती तारखेला भेटलो हे आज सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरवेळी मी ब्राम्हणी येथे राहण्यास होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे सरतपासाचे शपथपत्रात मी रा. ब्राम्हणी, ता. कळमेश्वर असे लिहीलेले चुकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासाचे शपथपत्रातील माहीती मी वकीलांना दावा दाखल केला त्याचेवळी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाचे शपथपत्रातील माहीती मी वकीलांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल केला त्यावेळी मी ब्राम्हणी येथे राहण्यास होतो.

४ माझा भाउ मुरलीधर सन २०१७ मध्ये मरण पावलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ मुरलीधरचे वारस आणि माझे संगनमत असुन, त्यांचे वारसांना माझेच वकीलांनी ओळख दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीला नोटीस तामील झाल्याची पोहच पावती दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोंदणीकृत डाकेने प्रतिवादीला नोटीस पाठविल्याचे दर्शविण्याचे दृष्टीने पोष्टाची पावती देखील दाखल केलेली नाही.

५ माझी वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये एक राहते घर, अकरा एकरचे एक शेत, तिन एकरचे एक शेत आणि एका एकराची पट्टी व चाळीस डेसीमलची एक पट्टी या मिळकती होत्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यात वडीलोपार्जीत घर मिळकत सामील केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, एकत्र कुटुंबाच्या मिळकतीतुन मी शेती व नागपूर येथील प्लॉट विकत घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, एकत्र कुटुबांच्या मिळकतीतुन मी ब्राम्हणी येथील घर बांधलेले आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, मी माझे पी.एफ. चे पैशातुन सदर घर बांधलेले आहे. मला माझे वयोमानामुळे आणि प्रकृतीमुळे पी.एफ. चे लोन/ॲडव्हॉन्स केव्हा घेतला होता हे आज सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पी.एफ. चे लोन घेतल्याचे दर्शविण्याचे कागदपत्रे प्रस्तुत

दाव्यात दाखल केलेले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, सदर कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी पी.एफ. चे लोनचे कागदपत्रे कार्यालयातुन प्राप्त करुन दाव्यात दाखल करु शकतो. भरपुर दिवस झाल्यामुळे निश्चीत किती कर्ज घेतले होते हे आज सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मालमत्ता विकत घेण्याकरीता कुठलेही कर्ज घेतले नसल्याकारणानेच त्या संदर्भातील कुठलेही कागदपत्रे दाखल कलेले नाहीत.

६ हे म्हणणे खरे नाही की, ब्राम्हणी येथील घर क्र.१९१२ एकत्र कुटुंबाच्या मिळकतीतुन खरेदी केलेले आहे.

७ हे मला माहीती नाही की, प्रतिवादी क्र.१ लिलाधर कळमेश्वर येथील टेक्सटाईल्स मिलमध्ये ठेकेदारी मध्ये काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणिवपुर्वक काही मिळकती वगळून खोटा दावा दाखल केलेला आहे. मला दरमहा रुपये १५००/- पेन्शन मिळते. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, १५००/- रुपये पेन्शन म्हणून न मिळता मानधन म्हणून मिळतात. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात व सरतपासाचे शपथपत्रात मला मानधन मिळत असल्याचे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा दावा व खोटे सरतपासाचे शपथपत्र आणि खोटे कागदपत्रे दाखल केलेले असुन आज खोटी साक्ष दिली आहे.

**फेरतपास : काही नाही**

माझे समक्ष, सा.ब.वा.दा.क.केले.

स्वाक्षरीत/-
( पी.डी. सावंत)
दि.न्या.क.स्तर, कळमेश्वर.
दिनांक : ०८.०३.२०१८.

स्वाक्षरीत/-
( पी.डी. सावंत)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कळमेश्वर.